पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३९२ दिनांक - २६/०५/२०२३**

**वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर**

**चिमटा वस्ती, वानवडी येथे घरफोडी करणारे चोर जेरबंद २,३८०००/- रु.कि.चा मुद्देमाल हस्तगत**

दि.१०/०५/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांचे मुळ गावी आंध्रप्रदेश येथे गेलेले असताना, दिनांक १०/०५/२०२३ ते दि.१६/०५/२०२३ रोजी वा.चे दरम्यान कोणीतरी अनोळखी इसमांनी फिर्यादीचे घरातील १) रू.४०,०००/-किंमतीची सोन्याची एक लहान चैन, २)६ ग्रॅम वजनाची,पट्टीची डिझाईन असलेली.६०,०००/- रु.किंमतीचे कानातील टॉप्स, ३)१० ग्रॅम वजनाचे, गोलाकार डिझाईन असलेले ६०,०००/- रु. किंमतीचे कानातील टॉप्स ४)१० ग्रॅम वजनाचे, खडयांची डिझाईन व लटकन असलेले जु.वा.किं.अं.६०,०००/- रु.किंमतीचे कानातील टॉप्स ५)१० ग्रॅम वजनाचे, साधी डिझाईन असलेले.जु.वा.किं.अं.१७,०००/- रु. किं.च्या चांदीच्या पट्टया, ६) १५० ग्रॅम वजनाच्या, साखळी व घुंगरांची डिझाईन असलेली ७)रू.१,०००/- किंमतीचे गोल्डन रंगाचे फिल्ट्रॉन कंपनीचे लेडीज घडयाळ, ७)५०,०००/- रुपये किंमतीच्या भारतीय चलनातील नोटा, नोटांचा तपशील सांगता येत नाही असे एकुण **रु.२,८८,०००/- किंचे दागिने व रोख रक्कम** हे फिर्यादीचे राहते घराचा मुख्य दरवाजा कशाचेतरी सहाय्याने तोडून घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजाचे लॉक तोडून कपाट उघडून लॉकरमध्यून फिर्यादीचे संमत्ती शिवाय लबाडीच्या इराद्याने स्वतःच्या फायद्या करीता चोरुन नेले म्हणुन फिर्यादीने अनोळखी इसम यांच्याविरुध्द कायदेशीर तक्रार दिल्याने वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे. **सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप-निरीक्षक,संतोष सोनवणे तपास पथक,वानवडी पोस्टे हे करत आहेत.**

सदर दाखल गुन्हयाचे अनुषंगाने,वानवडी तपास पथकातील पोउपनि संतोष सोनवणे व सर्व पोलीस अंमलदार यांनी चिमटा वस्ती, वानवडी भागातील संशयीत इसम यांचेकडे तपास करीत असताना, खाली नमूद आरोपीत यांना ताब्यात घेवून तपास केला. तपास अनुषंगाने साक्षीदार यांचेकडुन दुजोरा मिळालेनंतर आरोपीत यांना अटक करून झाले तपासाप्रमाणे घरफोडी करणारे आरोपीत यांचेकडुन घरात लपवून ठेवलेले **घरफोडी करून चोरी केलेले एकुण ३६ ग्रॅम वजनाचे सोने,तसेच १५० ग्रॅम वजनाचे चांदीच्या पाय पटया,मनगटी घडयाळ असे एकुण रू.२,३८,०००/-रुपये किं.चे सोन्याचे चांदीचे दागिने मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे**.
नमुद अटक आरोपीतांची नावे खालीलप्रमाणे.

१) **अभिषेक सुभाष जाधव,वय २१ वर्षे,रा.सव्हे नं.८१,चिमटा वस्ती,वानवडी,पुणे**
२) **मुयर महेंद्र मोरे,वय-२१ वर्षे,रा.सदर**

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशीक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उपआयुक्त,परि.-५,पुणे शहर,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर श्रीमती.पौर्णिमा तावरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक,भाऊसाहेब पटारे,पोलीस निरिक्षक,गुन्हे, संदिप शिवले व तपास पथकातील पोलीस उपनिरिक्षक,संतोष सोनवणे,पोलीस अंमलदार, अतुल गायकवाड, अमजद पठाण, संतोष नाईक, हरीदास कदम, महेश गाढवे, संदिप साळवे, विष्णु सुतार, राहुल गोसावी, निलकंठ राठोड, अमोल गायकवाड, विठ्ठल चोरमले व मनिषा सुतार, सोनम भगत यांनी केली आहे.